पुण्यनगरी

# चेन्नई एक्स्प्रेसमधून आफ्रिकन प्राण्यांची तस्करी



**कामशेत (पुणे)** : पुणे-लोणावळा लोहमार्गावर चेन्नई एक्स्प्रेस या रेल्वेगाडीत मंगळवारी (दि. २५) पुणे ते लोणावळादरम्यान दुर्मिळ आंतरराष्ट्रीय प्राण्यांची तस्करी करणाऱ्या दोघांना रेल्वे पोलिसांनी जेरबंद केले. याप्रकरणी तरुणकुमार मोहन (२६, रा. ३, अंबतुर, चेन्नई) व श्रीनिवासन कमल (२०, रा. ९२, कोल्लातूर, तामिळनाडू) यांना पुणे लोहमार्ग पोलिसांनी अटक केली आहे.

लोहमार्ग पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार विविध गाड्यांमधून विनापरवाना प्राण्यांची तस्करी होत असल्याची माहिती मिळाली होती. यावर पोलीस अधीक्षक सदानंद वायसे व पोलीस निरीक्षक मौला सय्यद यांनी पेट्रोलिंगकरिता स्टाफ नेमला होता. मंगळवारी (दि. २५) पुणे ते लोणावळादरम्यान चेन्नई एक्स्प्रेस या गाडीने प्रवास करणाऱ्या तरुणकुमार व श्रीनिवासन यांच्यावर संशय आल्याने त्यांच्याजवळ असणाऱ्या बॅगांची झडती घेण्यात आली.

यावेळी या दोघांकडे असणाऱ्या ४ ट्रॅव्हल बॅग व २ सॅक बॅगांमध्ये दुर्मिळ





## बॅगांमध्ये आढळले प्राणी

| २७९ | १२०७ | २३० |
|---|---|---|
| कासव | सरडे | मासे |

जातीच्या आफ्रिकन स्फुर्ड जातीचे २७९ कासव, इगुणा जातीचे १२०७ सरडे व बीटा जातीचे २३० मासे मिळून आले. यावर त्यांच्याकडे या परदेशी जातीचे प्राणी कुठल्याही प्रकारचे सीमा शुल्क न भरता आढळल्याने त्यांना पुढील कारवाईसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट, चांदणी चौक, बावधन, पुणे या ठिकाणी या दुर्मिळ प्राण्यांना ठेवण्यात आले आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक सदानंद वायसे, अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर-पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मौला सय्यद, सहायक पोलीस फौजदार सुनील भोकरे, अमरदीप साळुंके, इम्तियाज आवटी, नीलेश बीडकर, संदीप पवार, विक्रम मधे, माधव केंद्रे, बेबी थोरात, जगदीश सावंत, सुनील कदम, सुहास माळवदकर, दिनेश बोरनारे, फिरोज शेख या पथकाने केली आहे.